# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १२६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## ब्रिक्स परिषदेसाठी शी जिनपिंग भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता

**बीजिंग :** पुढील महिन्यात दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता आहे. त्यांच्यासोबत चीनचे एक मोठे शिष्टमंडळही भारतात येण्याची शक्यता आहे. गेल्या सात वर्षांतील शी जिनपिंग यांचा हा पहिलाच भारत दौरा असेल. तसेच, भारत आणि चीन या दोन प्रतिस्पर्धी देशांमधील संबंध सुधारण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा संकेत मानला जात आहे.

## मंत्री कार्यालयातील 'उसनवारी' आणि 'मौखिक' नेमणुका रद्द

मुंबई : विहित नियम आणि कायदेशीर प्रक्रिया डावलून मंत्रालयीन विभागांत तसेच मंत्र्यांच्या कार्यालयांत बाह्य कार्यालयांमधून परस्पर करण्यात आलेल्या उसनवारीवरील, तसेच मौखिक आदेशांच्या आधारावरील नेमणुका तात्काळ रद्द करण्याचे आदेश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १० सप्टेंबर २०२६ पर्यंत आपल्या मूळ कार्यालयात हजर होणे बंधनकारक करण्यात आले आहे. मंगळवारी याबाबतचे आदेश जारी करण्यात आले.

## थोडक्यात वार्ता

### परभणी जिल्ह्यातील तिघेजण हद्दपार

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी :** जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाणे हद्दीत गुंड प्रवृत्तीच्या तसेच नागरिकांच्या जीविकास व मालमत्तेस धोका निर्माण करून इतरांच्या जीवित किंवा व्यक्तिगत सुरक्षित धोका पोहोचवून दहशत निर्माण करणाऱ्या परभणी जिल्ह्यातील तिघांना हद्दपार करण्यात आले आहे.

नानपेठ पोलीस ठाणे हद्दीतील सलमान उर्फ चामुंडा पठाण.रा. मदिनानगर परभणी व शेख रफिक शेख चांद.रा सवेरा कॉलनी परभणी यांच्याविरुद्ध हद्दपारचा प्रस्ताव नानलपेठ पोलिसांनी पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत उपविभागीय दंडाधिकारी यांना पाठविला होता. तसेच दैठणा पोलीस ठाणे हद्दीतील. दिलीप माधवराव शिंदे.रा. धसाडी यांच्यावर हद्दपारीचा प्रस्ताव प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयामार्फत विभागीय दंडाधिकारी परभणी यांच्याकडे पाठविला होता. या प्रस्तावाची उपविभागीय दंडाधिकारी परभणी यांनी अंतिम चौकशी करून सलमान उर्फ चामुंडा खाजा पठाण.रा. मदिना नगर परभणी यास एका वर्षासाठी शेख रफिक. शेख चांद.रा. सवेरा कॉलनी परभणी यास तीन महिन्यासाठी आणि दिलीप माधवराव शिंदे.रा. धासाडी यास सहा महिन्यासाठी परभणी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे.

### हायवाच्या धडकेत 8 वर्षीय विद्यार्थिनी ठार, बहीण जखमी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर

वाळूज महानगरातील विटावा–एकलहेरा रस्त्यावर मंगळवारी दुपारी एका भरधाव हायवाने घेतलेल्या बळीमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. वाळूने भरलेल्या बेफाम हायवाने रस्ता ओलांडणाऱ्या दोन बहिणींना जोरदार धडक दिली. या दुर्दैवी अपघातात ८ वर्षीय विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला, तर तिची मोठी बहीण गंभीर जखमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी आरुषी कृष्णा तिवारी (वय ८) आणि तिची सोळा वर्षीय बहीण नंदनी तिवारी या विटावा–एकलहेरा रस्त्यावरून रस्ता ओलांडत होत्या. यादरम्यान वाळूने भरलेल्या एका भरधाव हायवाने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत आरुषी कृष्णा तिवारी ही चिमुरडी जागीच ठार झाली, तर तिची बहीण नंदनी तिवारी गंभीर जखमी झाली. तिला उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. अवैध आणि भरधाव वाळूच्या वाहतुकीमुळे होत असलेल्या अपघातांबाबत नागरिकांमध्ये तीव्र संताप होता. या रोषातून संतप्त नागरिकांनी दुर्घटना करणाऱ्या हायवची तोडफोड केली. घटना घडल्यानंतर चालक घटनास्थळावरून पसार झाला असून, एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे पथक त्याचा कसून शोध घेत आहे. या परिसरातील अनियंत्रित आणि भरधाव वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### शिक्षणात AI चा वाढता प्रभाव, भारताची शैक्षणिक व्यवस्था आता बदलणार

मुंबई : AI आता फक्त तंत्रज्ञान क्षेत्रापुरतं मर्यादित राहिलेलं नाही. ते थेट वर्गखोल्यांपर्यंत पोहोचलं आहे. पण प्रश्न असा आहे भारताची शिक्षणव्यवस्था AIसाठी किती तयार आहे आणि हा नवा उपक्रम काय बदल आणणार? QS I-GAUGEच्या नव्या अहवालानुसार, भारतातील केवळ १३ टक्के शाळांनी AIचं प्रगत आणि प्रणालीव्यापी एकत्रीकरण साध्य केलं आहे. या सर्वेक्षणात २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ७१ K-12 संस्थांमधील १,२०९ शिक्षकांचे, तर २७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील १४६ उच्च शिक्षण संस्थांतील १,११८ प्राध्यापकांची मतं घेण्यात आली.

### "शाल जोडे"




# राज्यातील सर्व रुग्णालयांचे अग्नि व विद्युत सुरक्षा ऑडिट बंधनकारक

## सहा महिन्यांच्या चक्रात प्रत्येक इमारत व ब्लॉकची तपासणी; आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देताना रुग्णालयांची सुरक्षा सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शासकीय, खासगी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील अग्निसुरक्षा, विद्युत व्यवस्था, इमारत बांधकाम तसेच रुग्णालयातील संबंधित यंत्रणांचे सुरक्षा ऑडिट तातडीने करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांचे सुरक्षित स्थलांतर आणि विद्युत सुरक्षेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आरोग्य विभागाने यापूर्वी विविध परिपत्रके व मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार सर्व आरोग्य संस्थांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांचे नियमित मूल्यांकन करून आढळणाऱ्या त्रुटी तातडीने दूर करणे आवश्यक आहे.

रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्णाच्या जीविताची सुरक्षा ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. त्यामुळे अग्निसुरक्षेच्या बाबतीत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. सर्व जिल्ह्यांतील शासकीय, खासगी आणि धर्मादाय आरोग्य संस्थांचे ऑडिट करून घेण्याची जबाबदारी रुग्णालय प्रमुख, विभागीय उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, महानगरपालिका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षक यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



रुग्णालयातील आयसीयू, एनआयसीयू, नर्सरी आणि ऑपरेशन थिएटर यांसारख्या संवेदनशील विभागांमधील अग्निसुरक्षा सज्जतेचा विशेष आढावा घेण्यात यावा. त्यासोबतच विद्युत सुरक्षा, वैद्यकीय गॅस पाइपलाइन प्रणाली, आपत्कालीन स्थलांतरण व्यवस्था, अग्निशमन उपकरणांची उपलब्धता व कार्यक्षमता, कर्मचारी प्रशिक्षण आणि मॉक ड्रिल यांचीही तपासणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

तपासणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटी व कमतरतांची नोंद करून त्यानुसार प्राधान्यक्रम निश्चित करावा आणि आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण कराव्यात, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

रुग्णालयाच्या आवारातील प्रत्येक इमारत आणि ब्लॉकचा सहा महिन्यांच्या चक्रात अग्निसुरक्षा मूल्यांकनात समावेश करण्यात यावा. केवळ कागदोपत्री फायर ऑडिट न करता प्रत्यक्ष परिस्थितीची तपासणी करून आवश्यक सुधारणा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यातील आरोग्य संस्थांच्या अग्निसुरक्षेची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रत्येक आरोग्य संस्थेत अग्निसुरक्षेसाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नोडल अधिकाऱ्यांनी फायर ऑडिट, विद्युत सुरक्षा, अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन स्थलांतरण व्यवस्था, कर्मचारी प्रशिक्षण आणि मॉक ड्रिलचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतची अनुपालन माहिती वरिष्ठ स्तरावर सादर करावी.

फायर ऑडिटमध्ये दिरंगाई किंवा सुरक्षा उपाययोजनांमधील गंभीर त्रुटींमुळे अनुचित घटना घडल्यास संबंधित संस्थाप्रमुखांची जबाबदारी निश्चित केली जाईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक शासकीय, खासगी आणि धर्मादाय आरोग्य संस्थेने अग्निसुरक्षा उपाययोजनांकडे गांभीर्याने पाहून आवश्यक कार्यवाही वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे.

अग्निसुरक्षा मूल्यांकन आणि त्यानंतर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे शासनास सादर करावा. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अग्निसुरक्षा व जीवित सुरक्षेबाबतच्या राष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.

## 287 आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत बियाणे वाटपाला मंजुरी

### जितेंद्र जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखालील कृषी समितीची बैठक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या कृषी समितीची मासिक सभा आज जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा कृषी समितीचे सभापती श्री. जितेंद्र जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेण्यासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या बैठकीस कृषी समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. जितेंद्र जैस्वाल, समिती सदस्य सौ. गीतांजली पाथ्रीकर, सौ. आयेशाबेगम सय्यद, सौ. स्वाती पाटेकर, श्री. अजिनाथ धामणे, सौ. सुप्रिया अनिलकुमार घुगे, जिल्हा कृषी विकास अधिकारी श्री. प्रकाश पाटील तसेच कृषी विभागातील इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीमध्ये जिल्ह्यात कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. यावेळी कृषी समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. जितेंद्र जैस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली २८७ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोफत बियाणे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांना शेतीच्या हंगामासाठी आवश्यक बियाणे उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय पीकविमा योजनेची व्याप्ती वाढवून त्यामध्ये भाजीपाला पिकांचाही समावेश करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना पीकविम्याचे संरक्षण मिळावे, यासाठी योजनेत आवश्यक बदल करण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली.

गंगापूर तालुक्यात टोमॅटो पिकावर झालेल्या प्रादुर्भावाबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. संबंधित भागातील शेतकऱ्यांच्या अडचणी, पिकांचे नुकसान आणि त्यावर करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला.

तसेच शासनामार्फत हमीभावाने धान्य खरेदी करताना शेतकऱ्यांना लागू असलेल्या जाचक अटींबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. या अटींमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा प्रभावी लाभ मिळावा, कृषी क्षेत्रातील समस्या तातडीने सोडवाव्यात आणि शेतकऱ्यांना आवश्यक सहकार्य उपलब्ध करून द्यावे, याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

## खुलताबादेत रंगला ऑल इंडिया मुशायरा; देशभरातील नामवंत शायरांनी गाजवली मैफल



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी खुलताबाद हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी जरबक्ष दूल्हा (रह.) यांच्या ७४० व्या उर्सानिमित्त येथील दर्गाह हजरत शेख बुरहानुद्दीन गरीब (रह.) येथे रविवारी (२३ ऑगस्ट) रात्री ऑल इंडिया मुशायरा उत्साहात पार पडला. रात्री १० वाजता सुरू झालेल्या या मुशायऱ्यात देशाच्या विविध भागांतून आलेल्या नामवंत शायरांनी आपल्या दमदार शायरीने उपस्थित रसिकांची मने जिंकली.

या मुशायऱ्यात नामवंत शायर अबरार काशिफ, आरिफ सैफी, इब्राहिम अली जीशान (जयपूर), असरार चौधरी (दिल्ली), बेलाल सहारनपुरी (सहारनपूर), तबरेज मुनव्वर राणा (लखनऊ), युसूफ राणा (मुंबई), नजमे हसन प्रतापगढी, सुफियान प्रतापगढी, कयामुद्दीन कयाम (खरगोन), साबिर मुस्तफाबादी (जळगाव), जुबेर गौहर (परभणी), इब्राहिम सागर (धुळे) आणि अता हैदराबादी (हैदराबाद) आदी शायरांनी आपल्या खास अंदाजातील शायरी सादर करून रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी नईम अख्तर खादमी (बुरहानपूर) यांनी सांभाळली, तर निजामतची धुरा नदिम फारुख (उत्तर प्रदेश) यांनी सांभाळली. मुशायऱ्याचे मुख्य आयोजक कमिटी खुद्दाम-ए-दरगाह, खुलताबाद असून, कन्व्हेनर म्हणून मुहम्मद इमरान आबिद जागीरदार यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडली.

यावेळी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, उपविभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, तहसीलदार तथा उर्स व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष गुट्टे, दरगाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहेमद, उपाध्यक्ष इमरान जहांगीरदार, सचिव मोहम्मद मतीन, सदस्य एड. कैसरोद्दीन,मुनीबोद्दीन, मुबशीरोद्दीन, सालेह मोहम्मद, हबीबोद्दीन,युसूफोद्दीन, अबरार अहेमद,यांच्यासह दरगाह कमिटीचे सदस्य आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

## ट्रम्प प्रशासनाकडून इराणला मदत करणाऱ्या भारतीय कंपन्यांवर निर्बंध

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिका आणि इराणमधील वाढत्या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानला मदत करणाऱ्या देशांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणला आर्थिकदृष्ट्या एकाकी पाडण्यासाठी सोमवारी 'ऑपरेशन इकॉनॉमिक आउटकास्ट'ची घोषणा केली. त्यानंतर ट्रम्प प्रशासनाने इराणकडून पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांची आयात केल्याप्रकरणी भारतातील चार कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. इराणसाठी संभाव्य महसुलाचे स्रोत रोखण्याच्या उद्देशाने अमेरिकेने हे नवे निर्बंध लागू केले आहेत.

तसेच, इतर देशांनीही इराणसोबतचे आर्थिक संबंध तोडावेत, असे अमेरिकेने आवाहन केले असून, तसे न केल्यास कारवाईचा इशारा दिला आहे.अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने सांगितले की, या कारवाईच्या कक्षेत भारतातील कस्टम ड्युटी ब्रोकर पोर्टईज पार्टनर्स एलएलपी तसेच त्यांचे भागीदार इंदरीसमिया अशरफमिया शेख आणि हरीश रामचंद्र रंगी यांचा समावेश आहे. या व्यक्तींनी इराणमधून पेट्रोकेमिकल उत्पादनांच्या अनेक खेपांची आयात करण्यास मदत केली होती.

रिपोर्टनुसार, निर्बंधांच्या कक्षेत आलेल्या इतर कंपन्यांमध्ये सदाशिव ओव्हरसीज लिमिटेड, पीपी सॉफ्टटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि प्रकृतिस इन्फ्रा इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश आहे. पीपी सॉफ्टटेकचे संचालक प्रशांत गर्ग यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. निवेदनानुसार, शेख, रंगी आणि गर्ग हे तिघेही भारतीय नागरिक आहेत. सदाशिव ओव्हरसीजने सुमारे ६.९ कोटी डॉलर किमतीच्या इराणी पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली.

तर पीपी सॉफ्टटेक आणि प्रकृतिस इन्फ्रा यांनी प्रत्येकी सुमारे २.५ कोटी डॉलर किमतीच्या पेट्रोलियम उत्पादनांची आयात केली. इराणकडून पेट्रोलियम किंवा पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी, अधिग्रहण, विक्री, वाहतूक किंवा विपणनाशी संबंधित महत्त्वाच्या व्यवहारांमध्ये जाणूनबुजून सहभागी झाल्याच्या आरोपावरून या कंपन्यांना निर्बंधांच्या यादीत टाकण्यात आले आहे.

## नेत्रदान पंधरवड्याचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शुभारंभ

### अत्याधुनिक उपकरणांसाठी लवकरच 14 कोटींचा निधी; नेत्रदानाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्रशल्यचिकित्सा विभागातर्फे नेत्रदान पंधरवड्याचा आज बाह्यरुग्ण विभाग क्रमांक १०७ येथे उत्साहात शुभारंभ करण्यात आला. २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या या पंधरवड्याच्या माध्यमातून नेत्रदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



यानिमित्त बाह्यरुग्ण विभागात नेत्रदान जनजागृतीपर पोस्टर व रांगोळी प्रदर्शन तसेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. त्यांनी पोस्टर व रांगोळी प्रदर्शनाची पाहणी करून सहभागी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे तसेच नेत्रदानाचा संदेश प्रभावीपणे मांडल्याबद्दल कौतुक केले.

पोस्टर व रांगोळी स्पर्धेचे परीक्षण जीवरसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिल्पा आसेगावकर, बालरोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. स्मिता मुंदडा, शल्यचिकित्सा विभागाच्या प्राध्यापक डॉ. अनिता कंडी आणि नेत्ररोग विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. संगीता पाटील यांनी केले. उत्कृष्ट पोस्टर व रांगोळींची निवड करून अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रशस्तिपत्रे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉ. वैशाली उने यांनी केले. नेत्रशल्यचिकित्सा विभागप्रमुख प्राध्यापक डॉ. अर्चना पाटील वरे यांनी नेत्रदानाचे महत्त्व विशद केले. कॉर्नियाच्या अंधत्वामुळे दृष्टी गमावलेल्या व्यक्तींना नेत्रदानामुळे पुन्हा दृष्टी मिळण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या सामाजिक चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी नेत्रशल्यचिकित्सा विभागाच्या शैक्षणिक, रुग्णसेवा आणि जनजागृतीपर उपक्रमांचे कौतुक केले. नेत्रविभाग अधिक प्रगत व अत्याधुनिक करण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच विभागासाठी लवकरच सुमारे १४ कोटी रुपयांची अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध होणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी दिली. या उपकरणांमुळे निदान, उपचार आणि शस्त्रक्रिया सुविधा अधिक सक्षम होऊन रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास नेत्रशल्यचिकित्सा विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. तपन जक्कल, सहाय्यक प्राध्यापक डॉ. महेश सोनपेठकर, डॉ. अनुपमा कोकाटे, डॉ. सनीरा वळसे, डॉ. सोहम पाल, डॉ. इमरान खान, तसेच वरिष्ठ व कनिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते. यावेळी उपअधिष्ठाता डॉ. गर्कल, डॉ. विनोद मुंदडा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश हरबडे, वार्धक्यशास्त्र विभागाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. शैलजा राव, स्त्रीरोग विभागाच्या प्राध्यापक डॉ. सोनाली देशपांडे, परिसेविका संजीवनी गायकवाड यांच्यासह महाविद्यालय व रुग्णालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शाळांमध्ये सुरक्षित व संतुलित आहारासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक व संतुलित आहार मिळावा, तसेच शाळांमध्ये अन्न सुरक्षा व सुरक्षित आहारासंदर्भातील नियमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद आणि अन्न व औषध प्रशासन विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

राज्यात लागू असलेल्या 'शाळेतील मुलांसाठी सुरक्षित अन्न आणि संतुलित आहार विनियम, २०२०'च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने ही कार्यशाळा पदमपुरा येथील राज्य आंग्ल भाषा केंद्रात आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातील शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित खासगी शाळा, पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळा तसेच निवासी शाळा व वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांना सुरक्षित, पौष्टिक व संतुलित अन्न मिळणे सुनिश्चित करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी शाळांची नोंदणी, शाळांमध्ये जंक फूडच्या विक्रीवर निर्बंध, शाळेच्या परिसरात तसेच परिसराच्या ५० मीटर अंतरात अशा खाद्यपदार्थांची विक्री, वितरण व जाहिरातीस मनाई, अन्न सुरक्षा दर्शक फलक लावणे तसेच राष्ट्रीय पोषण संस्थेने निश्चित केलेल्या आहारविषयक मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी या विषयांवर कार्यशाळेत सविस्तर माहिती देण्यात आली.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक संचालक दयानंद पाटील यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित अन्न उपलब्ध करून देणे, शाळांमध्ये स्वच्छ, पौष्टिक व संतुलित आहार सुनिश्चित करणे आणि अन्न सुरक्षा व मानके विनियमांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संघरत्न सरोदे आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांची सुरक्षित आहाराच्या अंमलबजावणीतील भूमिका यावेळी स्पष्ट करण्यात आली.

कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, अधीक्षक (पीएम पोषण), विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि अंगणवाडी पर्यवेक्षिका उपस्थित होत्या.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी गीता तांदळे, उपशिक्षणाधिकारी संतोष गोरे आणि लेखा अधिकारी (पीएम पोषण) यांनी परिश्रम घेतले.

# सं पा द की य

## रुग्णालयांची सुरक्षा आणि जिवाचे मोल

राज्यातील शासकीय, खासगी आणि धर्मादाय रुग्णालयांचे अग्निसुरक्षा, विद्युत व्यवस्था व इमारतींचे सुरक्षा ऑडिट तातडीने करून अहवाल सादर करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले आहेत. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची सुरक्षा ही सर्वोच्च जबाबदारी मानून सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, हा दिलेला इशारा अत्यंत योग्य आणि काळाची गरज आहे. मात्र, अशा सूचना केवळ परिपत्रकांपर्यंत मर्यादित न राहता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे अधिक महत्त्वाचे आहे. भूतकाळात राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये घडलेल्या आगीच्या दुर्दैवी घटना आणि त्यात निष्पाप रुग्णांना गमवावा लागलेला जीव हा अत्यंत वेदनादायी इतिहास आहे. आयसीयू, एनआयसीयू, नर्सरी आणि ऑपरेशन थिएटर यांसारख्या अत्यंत संवेदनशील विभागांमध्ये रुग्ण स्वतःचा बचाव करण्याच्या स्थितीत नसतात. अशा ठिकाणी केवळ कागदोपत्री 'फायर एनओसी' मिळवणे किंवा औपचारिक ऑडिट करणे हा रुग्णांच्या जिवाशी केलेला खेळ ठरतो. सहा महिन्यांच्या चक्रात प्रत्यक्ष पाहणी करून ऑडिट करणे, नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि कर्मचाऱ्यांचे नियमित मॉक ड्रिल अनिवार्य करण्याचा निर्णय प्रशासकीय शिस्त आणणारा आहे. केवळ नियमावली जाहीर करून भागणार नाही, तर त्रुटी आढळणाऱ्या रुग्णालयांवर आणि निष्काळजी संस्थाप्रमुखांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची धमक प्रशासनाने दाखवली पाहिजे. सरकारी रुग्णालयांना आवश्यक निधी उपलब्ध करून देणे आणि खासगी रुग्णालयांना सुरक्षा निकष पाळण्यास भाग पाडणे गरजेचे आहे. आरोग्य सेवा पुरवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकीच उपचारादरम्यान रुग्णांच्या जीविताची सुरक्षितता सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे. शासनाने उगारलेला हा बडगा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष भूमीवर प्रभावी ठरला, तरच रुग्णालये ही खऱ्या अर्थाने सुरक्षित 'जीवदान केंद्रे' राहतील.

## आंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची मान्यवरांनी घेतली सदिच्छा भेट

### मराठा आरक्षणासह समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

आंतरवाली सराटी : आंतरवाली सराटी येथे कॅबिनेट मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, शंभूराजे देसाई तसेच आमदार प्रसाद लाड यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मराठा आरक्षणाच्या प्रश्नासह समाजाच्या विविध मागण्या आणि जनहिताच्या विषयांवर सकारात्मक व सविस्तर चर्चा करण्यात आली.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाची भूमिका, समाजाच्या विविध मागण्या तसेच त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही याबाबत यावेळी विचारविनिमय झाला. समाजाच्या प्रश्नांवर संवाद आणि समन्वयाच्या माध्यमातून सकारात्मक मार्ग काढण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.

मनोज जरांगे पाटील यांच्या आगामी भूमिकेच्या पार्श्वभूमीवरही यावेळी सविस्तर संवाद साधण्यात आला. मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक वातावरणात चर्चा होणे आणि समाजहिताला प्राधान्य देत प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, यावर उपस्थित मान्यवरांनी भर दिला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्यासह संबंधित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भेटीदरम्यान मराठा समाजाच्या प्रश्नांवर शासन आणि समाजातील प्रतिनिधींमध्ये संवाद कायम ठेवण्याच्या दृष्टीनेही चर्चा झाली.

# 'स्कूल ठीक करो' अभियान : शाळा सुधारल्या तरच देशाचे भविष्य घडेल

## शासन, समाज, स्वयंसेवी संस्था, CSR आणि तरुणाईने एकत्र येण्याची हीच वेळ

एखाद्या राष्ट्राचे भविष्य केवळ संसदेत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये घडत नाही; त्या भविष्याची खरी पायाभरणी शाळेच्या वर्गखोलीत होत असते. आज शाळेच्या बाकावर बसलेला विद्यार्थीच उद्या डॉक्टर, अभियंता, शिक्षक, वैज्ञानिक, प्रशासक, उद्योजक, शेतकरी किंवा जबाबदार नागरिक होणार आहे. म्हणून शाळा म्हणजे केवळ चार भिंतींची इमारत नाही; ती राष्ट्रनिर्मितीची पहिली प्रयोगशाळा आहे.

भारत आज डिजिटल क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ संशोधन, आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे. परंतु या प्रगतीसोबतच शिक्षणव्यवस्थेतील तफावत आणि पायाभूत सुविधांची वास्तवस्थितीही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. यु-डायस प्लस २०२४-२०२५ मध्ये देशातील शाळांमध्ये संगणक सुविधा, अध्यापनासाठी कार्यरत संगणक, इंटरनेट, पिण्याचे पाणी, हात धुण्याची सुविधा, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुविधा अशा अनेक बाबींची स्वतंत्र नोंद करण्यात आली आहे. यावरून शाळेचा विकास हा केवळ इमारत बांधण्यापुरता मर्यादित नसून अनेक घटकांचा एकत्रित प्रश्न आहे, हे स्पष्ट होते.याच पार्श्वभूमीवर 'स्कूल ठीक करो' हे अभियान केवळ एक घोषवाक्य न राहता शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत समाजाला जागे करणारी चळवळ ठरू शकते. काक्रोज जनता पार्टीच्या 'स्कूल ठीक करो' अभियानातून अभिजीत दिपके आणि त्यांच्या टीमने शाळांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नाचे स्वागत करतानाच आता शासन, समाज, स्वयंसेवी संस्था, CSR क्षेत्र, शिक्षक, पालक आणि तरुणाई यांनी या प्रश्नाकडे केवळ टीकेच्या नजरेने न पाहता उपायाच्या दिशेने एकत्र चालण्याची गरज आहे.

शाळेची अवस्था म्हणजे समाजाच्या भविष्याचा आरसा

सरकारी शाळांमध्ये प्रामुख्याने सर्वसामान्य, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुले शिक्षण घेतात. त्यांच्या पालकांकडे महागड्या खासगी शिक्षणाचा खर्च करण्याची क्षमता नसू शकते; परंतु आपल्या मुलाने शिकावे, पुढे जावे आणि चांगले जीवन जगावे, ही त्यांची स्वप्ने मात्र मोठी असतात.

गरीब आई आपल्या मुलाच्या हातात दप्तर देते, तेव्हा तिच्याकडे कदाचित महागडे साधनसामग्री नसते; पण तिच्या डोळ्यांत एक मोठे स्वप्न असते "माझ्या मुलाने शिकावे, मोठे व्हावे आणि आपल्या पायावर उभे राहावे." म्हणून शाळेतील कमतरता ही केवळ शासकीय यंत्रणेची आकडेवारी नाही. तिच्यामागे हजारो पालकांची स्वप्ने आणि लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य असते. सरकारी शाळेत शिकणारा विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या गरीब असू शकतो; परंतु त्याची बुद्धिमत्ता गरीब नसते. त्याच्या स्वप्नांची उंची कमी नसते. त्याला दयेची नव्हे, तर समान संधीची आणि दर्जेदार शिक्षणाची गरज असते.

भारतीय संविधानाने शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले आहे. ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची घटनात्मक तरतूद आहे आणि शिक्षणाचा अधिकार कायद्याने त्याला संस्थात्मक आधार दिला आहे. म्हणून शाळेत जाणाऱ्या मुलाला केवळ प्रवेश मिळणे पुरेसे नाही. त्याला शिकण्यासाठी योग्य वातावरण मिळाले पाहिजे.

स्वच्छ आणि सुरक्षित वर्गखोली, पुरेसे बाक, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीज, ग्रंथालय, प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा, डिजिटल साधने, इंटरनेट, सुरक्षित परिसर आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सक्षम व पुरेसे शिक्षक या सर्वांचा विचार शाळेच्या गुणवत्तेचा भाग म्हणून झाला पाहिजे.

डिजिटल बोर्ड बसवणे म्हणजे डिजिटल शिक्षण नव्हे; संगणक देणे म्हणजे डिजिटल साक्षरता नव्हे; इमारत रंगवणे म्हणजे शाळा विकसित करणे नव्हे.त्या साधनांचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात प्रत्यक्ष वापर होतो का, शिक्षकांना त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळते का आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेत सुधारणा होते का, हेही पाहिले पाहिजे.शाळेची इमारत चांगली असणे आवश्यक आहे; परंतु केवळ इमारत चांगली असून चालणार नाही. शिक्षणाचा दर्जा हा केंद्रस्थानी असला पाहिजे.

ASER २०२४ सारख्या मोठ्या ग्रामीण सर्वेक्षणांमधून मुलांचे नामांकन, वाचन, गणित आणि डिजिटल कौशल्ये यासंबंधी महत्त्वाची माहिती उपलब्ध होत असते. ASER २०२४ मध्ये ६५०,००० हून अधिक मुलांचा ६०० पेक्षा अधिक विविध राज्यांतील जिल्ह्यांमध्ये अभ्यास करण्यात आला. त्यामुळे शाळेत मुलांची उपस्थिती आणि त्यांचे प्रत्यक्ष शिकणे या दोन वेगळ्या बाबी आहेत, हे पुन्हा अधोरेखित होते.आज शिक्षणव्यवस्थेसमोर एक महत्त्वाचे आव्हान आहे मुलगा शाळेत आहे का? याबरोबरच मुलगा प्रत्यक्षात शिकतो आहे का? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.वाचन, लेखन, गणित, विज्ञान, भाषा, समस्या सोडविण्याची क्षमता, तर्कशक्ती, संवादकौशल्य आणि डिजिटल साक्षरता यांचा विकास हा शिक्षणाचा खरा परिणाम मानला पाहिजे. यासाठी शासनाची जबाबदारी सर्वांत महत्त्वाची आहे.

'स्कूल ठीक करो'सारख्या अभियानांचे स्वागत करताना एक मूलभूत गोष्ट स्पष्ट केली पाहिजे सरकारी शाळांचा मूलभूत विकास ही शासनाची जबाबदारी आहे.

शाळांना आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, शिक्षकांची पदे भरणे, इमारतींची देखभाल करणे, पाणी व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करणे, प्रयोगशाळा व ग्रंथालये विकसित करणे, डिजिटल सुविधा उपलब्ध करून देणे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्यवस्था करणे, या बाबतीत शासनाने दीर्घकालीन आणि परिणामकारक धोरण आखले पाहिजे.

महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि भौगोलिकदृष्ट्या विविध राज्यात दुर्गम गावे, वाड्या-वस्त्या, पाडे, आदिवासी क्षेत्रे आणि शहरी भागातील गरजू शाळा अशा अनेक प्रकारच्या परिस्थिती आहेत. प्रत्येक ठिकाणी समान पद्धतीने समस्या सुटत नाहीत. त्यामुळे स्थानिक गरजेनुसार शाळा विकासाची योजना आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाच्या २०२६-२७ च्या वार्षिक योजना आणि अर्थसंकल्पीय प्रक्रियेत विविध विभागांसाठी नियोजन सुरू आहे; शिक्षणासारख्या मूलभूत क्षेत्रातील गुंतवणुकीचे मोजमाप केवळ खर्चाच्या आकड्यांनी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष परिणामांनी झाले पाहिजे.

सरकारची यंत्रणा मोठी असली तरी प्रत्येक गावातील प्रत्येक गरज सरकारपर्यंत तत्काळ पोहोचेलच असे नाही. येथे स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते.

राज्यात अनेक स्वयंसेवी संस्था शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, कौशल्य विकास आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात काम करीत आहेत. स्थानिक समाजाशी त्यांचे संबंध असतात. गावातील परिस्थिती, पालकांच्या अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या गरजा त्यांना जवळून माहिती असतात.

म्हणून शासनाने पात्र, अनुभवी आणि विश्वासार्ह स्वयंसेवी संस्थांसाठी 'शाळा परिवर्तन भागीदारी' किंवा तत्सम पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याचा विचार करावा.एखादी संस्था एखाद्या शाळेत ग्रंथालय उभारू शकते. एखादी संस्था विज्ञान प्रयोगशाळा विकसित करू शकते. CSRच्या माध्यमातून संगणक, डिजिटल साधने, इंटरनेट, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, क्रीडा साहित्य किंवा कौशल्याधारित उपक्रमांना मदत मिळू शकते.परंतु येथे एक अत्यंत महत्त्वाची मर्यादा आहे CSR आणि स्वयंसेवी संस्थांची मदत ही शासनाच्या जबाबदारीचा पर्याय नसून पूरक भागीदारी असली पाहिजे. शिक्षणाच्या मूलभूत जबाबदारीतून शासनाने मागे हटण्याचे कारण CSR होऊ शकत नाही.CSR निधीचा वापर गरजेनुसार आणि पारदर्शकपणे

CSR क्षेत्राकडे मोठी सामाजिक गुंतवणूक करण्याची क्षमता आहे. परंतु CSRच्या माध्यमातून शाळांमध्ये सुविधा उभारताना केवळ फोटोसेशन किंवा उद्घाटनापुरते काम मर्यादित राहू नये.कोणत्या शाळेला काय गरज आहे? किती निधी आवश्यक आहे? निधी कोणी दिला? काम कोणी केले? कामाची गुणवत्ता काय आहे? त्याचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष फायदा किती झाला? या सर्व प्रश्नांची उत्तरे पारदर्शक असली पाहिजेत.'एक कंपनी एक शाळा' अशा संकल्पनेपासून पुढे जात 'एक शाळा एक विकास आराखडा' ही संकल्पना अधिक प्रभावी ठरू शकते. शाळेच्या गरजांचे सर्वेक्षण करून प्राधान्यक्रम ठरवावा. त्यानंतर शासन, CSR आणि स्वयंसेवी संस्था यांची भूमिका निश्चित करावी आणि कामाचे नियमित सामाजिक व शैक्षणिक मूल्यमापन करावे.

शाळा सुधारण्याची जबाबदारी केवळ सरकारची किंवा स्वयंसेवी संस्थांची नाही. गावकऱ्यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे.ग्रामसभा, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक तरुण यांनी शाळेच्या विकासासाठी नियमितपणे एकत्र यायला हवे.काही ठिकाणी श्रमदानातून परिसर स्वच्छ होऊ शकतो. स्थानिक दात्यांच्या मदतीने ग्रंथालय विकसित होऊ शकते. माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने करिअर मार्गदर्शनाचे कार्यक्रम होऊ शकतात. तरुणांच्या मदतीने डिजिटल साक्षरता आणि वाचन चळवळ सुरू होऊ शकते.

प्रत्येक गावाने एक प्रश्न स्वतःला विचारला पाहिजे "ही सरकारची शाळा आहे की आपल्या मुलांची शाळा?" उत्तर स्पष्ट आहे ही आपल्या मुलांची शाळा आहे.

तरुणाईचा आवाज केवळ सोशल मीडियापुरता राहू नये आजची तरुण पिढी प्रश्न विचारते, माहिती शोधते आणि सामाजिक प्रश्नांवर आपली भूमिका मांडते. 'स्कूल ठीक करो' अभियानात तरुणांचा सहभाग ही सकारात्मक बाब आहे.

परंतु आंदोलनाचा अंतिम उद्देश केवळ दोष दाखवणे नसावा. दोष दाखवा, उपाय सुचवा आणि उपायाच्या अंमलबजावणीसाठीही पुढे या, ही भूमिका अधिक परिणामकारक ठरेल. एखाद्या शाळेची समस्या सोशल मीडियावर मांडल्यानंतर पुढचा प्रश्न असावा ही समस्या सोडवण्यासाठी आपण काय करू शकतो? हा प्रश्न विचारणारी तरुणाई शिक्षणव्यवस्थेच्या परिवर्तनाची मोठी ताकद बनू शकते.

आजच्या काळात तंत्रज्ञान विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा महत्त्वाचा भाग बनत आहे. त्यामुळे शहरातील आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या संधींमध्ये अनावश्यक दरी राहू नये.

शहरातील मुलाला संगणक, इंटरनेट, प्रयोगशाळा आणि विविध शैक्षणिक साधने उपलब्ध असतील तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यालाही गुणवत्तापूर्ण डिजिटल आणि प्रयोगाधारित शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे.

मुलाचा पत्ता बदलला म्हणून त्याच्या स्वप्नांची किंमत बदलता कामा नये.गावातील मुलाच्या हातातही तंत्रज्ञान असावे, पण त्याचबरोबर त्याच्या हातात पुस्तकही असावे. त्याला इंटरनेट मिळावे, पण त्याचबरोबर उत्तम शिक्षकही मिळावा. त्याला डिजिटल बोर्ड मिळावा, पण त्याचबरोबर प्रयोग करून शिकण्याची संधीही मिळावी.

'स्कूल ठीक करो' अभियानाला व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप द्यायचे असेल तर प्रत्येक शाळेसाठी स्थानिक पातळीवर कृती आराखडा तयार करता येईल.

प्रत्येक शाळेचे पायाभूत सुविधांचे स्वतंत्र ऑडिट.शिक्षकांची उपलब्धता आणि विषयवार गरजांचे परीक्षण. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य.प्रत्येक शाळेसाठी ग्रंथालय आणि वाचन संस्कृतीचा विकास.विज्ञान आणि गणितासाठी प्रयोगाधारित शिक्षण. संगणक, इंटरनेट आणि डिजिटल साधनांचा प्रत्यक्ष शैक्षणिक वापर. क्रीडा आणि विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी सुविधा.विद्यार्थ्यांसाठी कौशल्य, करिअर आणि जीवनकौशल्य उपक्रम.पालक, ग्रामपंचायत, माजी विद्यार्थी आणि स्थानिक संस्थांचा सहभाग.दरवर्षी शाळेच्या विकासाचा सार्वजनिक अहवाल आणि सामाजिक लेखापरीक्षण करून घेणे गरजेचे असते.

आपण भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहतो. मोठे महामार्ग, उद्योग, आधुनिक शहरे, डिजिटल अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाची प्रगती आवश्यक आहे. पण या सर्व विकासाचा अंतिम लाभ जर देशातील शेवटच्या गावातील मुलापर्यंत पोहोचत नसेल, तर विकासाची प्रक्रिया अपुरी आहे.भारताचे भविष्य केवळ महानगरांतील मोठ्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातात नाही.

ते एका छोट्या गावातील सरकारी शाळेच्या बाकावर बसलेल्या मुलाच्या हातातही आहे.तो विद्यार्थी उद्या वैज्ञानिक होऊ शकतो. डॉक्टर होऊ शकतो. शिक्षक होऊ शकतो. अधिकारी होऊ शकतो. उद्योजक होऊ शकतो. किंवा आपल्या गावाचा विकास करणारा संवेदनशील नागरिक होऊ शकतो.

पण त्यासाठी आज त्याला योग्य संधी मिळाली पाहिजे.

एकाखाद्या छोट्याशा गावातील आई आपल्या मुलाच्या हातात दप्तर देते. तिच्या घरात कदाचित आधुनिक सुविधा नसतील. तिच्याकडे मोठी संपत्ती नसेल. पण तिच्या मनात एक मोठी आशा असते "माझ्या मुलाने शिकावे आणि माझ्यापेक्षा चांगले आयुष्य जगावे." तो मुलगा सरकारी शाळेत प्रवेश घेतो.त्याच्या पायात महागडे बूट नसतील. दप्तर साधे असेल. पण त्याच्या डोळ्यांत भारताचे भविष्य असेल.त्या डोळ्यांतील स्वप्न आपण ओळखले पाहिजे.

त्याला चांगली वर्गखोली दिली पाहिजे.त्याला सक्षम शिक्षक दिला पाहिजे.त्याला पुस्तकांचे जग दिले पाहिजे.त्याला प्रयोगातून विज्ञान शिकण्याची संधी दिली पाहिजे.

त्याला तंत्रज्ञानाशी जोडले पाहिजे.

त्याला खेळाचे मैदान दिले पाहिजे.

आणि सर्वांत महत्त्वाचे त्याला समान संधी दिली पाहिजे.

कारण उद्या देशाला उंचीवर नेणारा वैज्ञानिक, डॉक्टर, शिक्षक, अधिकारी किंवा उद्योजक कदाचित आज आपल्या गावातील एका साध्या सरकारी शाळेच्या बाकावर बसलेला असेल.

म्हणून एका शाळेकडे दुर्लक्ष करणे म्हणजे केवळ एका इमारतीकडे दुर्लक्ष करणे नाही; ते एका पिढीच्या शक्यतांकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

'स्कूल ठीक करो' ही चळवळ केवळ सोशल मीडियावरील हॅशटॅग किंवा काही दिवसांचा कार्यक्रम राहता कामा नये. ती शाळांच्या गुणवत्तापूर्ण परिवर्तनाची व्यापक सामाजिक चळवळ झाली पाहिजे.

शासनाने आपली मूलभूत जबाबदारी पार पाडावी.

CSR क्षेत्राने गरजाधारित सामाजिक गुंतवणूक करावी.

स्वयंसेवी संस्थांनी तळागाळातील अनुभव आणि मनुष्यबळ शासनाच्या प्रयत्नांना जोडावे.

ग्रामस्थांनी शाळेशी नाते जोडावे.

पालकांनी शाळेच्या विकासात सहभागी व्हावे.शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची बांधिलकी जपावी.आणि तरुणाईने प्रश्न विचारतानाच उपायांच्या दिशेने पुढे यावे.ही सर्व शक्ती एकत्र आली तर 'स्कूल ठीक करो' ही घोषणा केवळ आवाज राहणार नाही; ती शाळा परिवर्तनाची चळवळ बनेल.

आज एका शाळेचा प्रश्न सोडवूया.

उद्या एका गावाचे भविष्य बदलूया.

आणि पुढे एका पिढीचे भविष्य घडवूया.शाळा ठीक करा कारण तिथे भारताचे भविष्य शिकत आहे.

सरकारी शाळा सक्षम करा कारण तिथे सर्वसामान्यांच्या स्वप्नांना आकार मिळत आहे.आणि चला, एक सामूहिक संकल्प करूया

"प्रत्येक गावात सुसज्ज शाळा, प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण आणि प्रत्येक स्वप्नाला समान संधी मिळवून देऊ या!"

काक्रोज जनता पार्टीच्या 'स्कूल ठीक करो' अभियानाला आणि अभिजीत दिपके व त्यांच्या संपूर्ण टीमला या महत्त्वपूर्ण विषयाकडे समाजाचे लक्ष वेधल्याबद्दल मनापासून सलाम! लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

रामदास वच्छलामाई रखमाजी वाघमारे
छत्रपती संभाजीनगर
मो.नं.8888125610

# सरला बेटाचा प्रमुख तीर्थस्थळ म्हणून विकास करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अहिल्यानगर : तीर्थस्थळ म्हणून सरला बेटाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून सर्व विकासकामे पूर्ण झाल्यावर सरला बेट महाराष्ट्रातील भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा केंद्र असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सरला बेट विकासाचा आराखड्याच्या माध्यमातून सभागृह, रस्ते, पूरसंरक्षण आणि सौरऊर्जा यासह विविध कामे सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेल कोल्हे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या परंपरेचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सरला बेटावर या ठिकाणाहून समाजाला विचार आणि प्रेरणा मिळते. हरिनाम संकीर्तनामुळे दुःखाचे हरण होते, मनातील 'मी'पणा दूर होतो आणि जातीभेद विसरून सर्वजण एकत्र येतात. प्रत्येकामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्याची भावना निर्माण होते. आजच्या जगामध्ये हरिनाम संकीर्तन समाजाला एकत्र आणणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा मोठा उपाय आहे.

भारताची संस्कृती आणि सभ्यता जगातील सर्वात जुनी असून, हजारो वर्षांपासून या भूमीवर सनातन विचार, संस्कार आणि आध्यात्माची




परंपरा अखंड सुरू आहे. अनेक आक्रमणे झाली तरी आपल्या विचारांना, संस्कारांना आणि श्रद्धेला कोणीही बदलू शकले नाही. वारकरी परंपरा, गुरु परंपरा आणि हरिनामाच्या शक्तीमुळे ही संस्कृती अखंड राहिली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

हरिनाम संकीर्तनात शेतकरी बांधव सहभागी होत असल्याचा उल्लेख करतांना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, वारकरी, शेतमजूर आणि समाजातील वंचित घटाकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असvल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत साडेबारा लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली असून, ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर पंधरा दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. टप्प्याटप्प्याने १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. पुढील काळात वर्षभार १२ तास मोफत वीज देण्याचा निर्धाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांची ५८ हजार कोटी रुपयांची थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असल्याचेही श्री. फडणवीस म्हणाले.

हरिनाम सप्ताह समाजाला एकत्र आणणारा आध्यात्मिक सोहळा –एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अखंड हरिनाम सप्ताह हा अलौकिक सोहळा असून, या भूमीला योगीराज गंगागिरी महाराजांच्या तपश्चर्येचा आणि आशीर्वादाचा स्पर्श लाभला आहे. महंत रामगिरी महाराजांच्या अमृतवाणीतून भक्तीचा अखंड प्रवाह सुरू आहे. हरिनाम सप्ताह हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि संस्कारांची ऊर्जा देणारा सोहळा आहे.

गंगागिरी महाराजांनी सुरू केलेली १७९ वर्षांची ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने पुढे सुरू आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, प्रसन्नता आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे. 'गावची एकी तर देवाची कृपा नक्की' याचा प्रत्यय या सप्ताहातून येत असून, पंचक्रोशीतील नागरिकांचे ऐक्य येथे दिसून येत आहे, असे श्री. शिंदे यांनी सांगितले.

शेतकरी आणि महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा उल्लेख करत ते म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहील. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेसोबत राज्य शासनाने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे. शासनाच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे, अशी शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफीच्या दुसऱ्या टप्प्यात सहा लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार कोटी रुपये जमा करण्यात आल्याचेही श्री.शिंदे यांनी नमूद केले.

अखंड हरीनाम सप्ताह समाजाला दिशा देणारा –डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

पालकमंत्री डॉ. पाटील म्हणाले, अखंड नामसप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारा, शांती देणारा आणि जीवनाला योग्य दिशा देणारा आध्यात्मिक सोहळा आहे. सात दिवसांच्या नामस्मरणातून आणि महंत रामगिरी महाराजांच्या मधुर वाणीतून परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव वाढविण्याचा तसेच व्यसनमुक्त आणि बलशाली समाज घडविण्याचा संदेश मिळतो.

महंत रामगिरी महाराज अध्यात्माचा वारसा पुढे नेत असून, त्यांच्या आध्यात्मिक चळवळीचे समाजाला दिशा देण्याच्यादृष्टीने मोठे महत्त्व आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून संतांचे विचार आणि संस्कार समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचत आहेत. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासन आवश्यक सहकार्य करेल, अशी ग्वाही डॉ.विखे पाटील यांनी दिली.

वंदे मातरम् गीताच्या समूह गायन बद्दल महंत रामगिरी महाराज यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. सोनियाचा दिन आज उगवला या अभंगाच्या

# फर्दापुर येथे महिला भाविकांनी कावड यात्रा मोठ्या उत्साहात केली संपन्न



**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापुर येथे महिला भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत भव्य कावड यात्रा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न केली टाळ-चिपळ्यांचा गजर आणि संगीतमय वातावरणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता

**कावड यात्रेचे प्रमुख उपक्रम :** जलपूजन व संकलन श्रीक्षेत्र चौंडेश्वर महादेव मंदिरासमोरील वाघूर नदीच्या पात्रातून महिलांनी पवित्र जल कलश आणि कावडमध्ये भरून घेतले

जलाभिषेक वाघूर नदीवरून आणलेल्या पवित्र जलाचा श्रीक्षेत्र चौंडेश्वर महादेव आणि फर्दापुर येथील निर्माणाधीन 'शिवतीर्थ महादेव मंदिरात भाविक महिलांनी भक्तिभावाने जलाभिषेक केला

पुढील वर्षाचा संकल्प महिलांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत पुढील वर्षी याहूनही मोठ्या प्रमाणावर कावड यात्रा आयोजित करण्याचा दृढ संकल्प केला

**कावड यात्रेचे पौराणिक व धार्मिक महत्त्व :** शिवश्रद्धा व परंपरा भगवान शिवाप्रती असलेली अटूट श्रद्धा आणि प्राचीन पौराणिक परंपरांचे जतन करणे हा या यात्रेचा मुख्य उद्देश आहे

समुद्रमंथन कथा पौराणिक मान्यतेनुसार समुद्रमंथनातून निघालेले हलाहल विष भगवान शिवाने प्राशन केले होते त्या विषाचा दाह आणि उष्णता शांत करण्यासाठी देव दानवांनी शिवाला गंगाजल अर्पण केले होते श्रावणातील प्रथा याच पौराणिक घटनेचे स्मरण म्हणून श्रावण महिन्यात शिवभक्त पवित्र नद्यांचे जल कावडमध्ये वाहून आणतात आणि शिवलिंगावर जलाभिषेक करतात

या धार्मिक सोहळ्यात उज्वला पाटील चंद्रकला शिंदे मनिषा जोशी प्रमिला बुरकुल मंगला जाधव गिते ताई अनिता जंजाळ मनीषा माळी अनिता काळे हरसोले ताई शकुंतला कापसे पार्वती लंबे फुकटे आई सविता लव्हाळे सिंधु शिंदे कविता शिंदे नर्मदा कापसे नीता काळे आशा लव्हाळे यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक महिला भाविक सहभागी झाल्या होत्या

# जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी घेतला अतिक्रमण काढण्याबाबतचा आढावा

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.

**परभणी,** : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतची अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे 31 ऑगस्टपूर्वी काढण्याची कार्यवाही जिल्हाभरात विविध ठिकाणी सुरु झाली आहे. उद्या 26 ऑगस्ट रोजी कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यात आली असली तरीही गुरुवारी पुन्हा त्याच वेगाने अतिक्रमण काढण्याचे निर्देश आज जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी यंत्रणेला दिले. तसेच आजपर्यंत यंत्रणेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा त्यांनी आज ऑनलाईन आढावा घेतला.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर, राष्ट्रीय महामार्गाच्या अधीक्षक अभियंता तृप्ती नाग, उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण, जीवराज डापकर, उपप्रादेशिक परिवहन विभागाचे आशिष पाराशर, संबंधित राष्ट्रीय व राज्य महामार्ग विभागांचे कार्यकारी अभियंता, तहसीलदार, मुख्याधिकारी, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाने दि. १३ जुलै २०२६ रोजी स्वतःहून दखल घेतलेल्या याचिका व रिट याचिकेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी ऑनलाईन आढावा घेत निर्देश दिले. राष्ट्रीय महामार्गाच्या संबंधित विभागांनी स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही सुरु आहे. अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीचा वेग वाढवून जास्तीत जास्त रस्ते-महामार्ग मोकळे करून घ्यावेत. तसेच अतिक्रमण काढल्यानंतर त्या वस्तू पुन्हा शासकीय जागेत टाकल्या जाणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. तसेच रस्ते व



महामार्गालगतची अतिक्रमणे काढताना ती स्वतअहून काढत असल्यास संबंधितांचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. त्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्यास कायद्यानुसार निष्कासनाची कार्यवाही करावी. कार्यवाहीसाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून घेत कार्यवाहीला विलंब होऊ नये, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी जिल्ह्यातील NH-752-I जिंतूर–परभणी मार्गाची संबंधित प्रकल्प नोंदीनुसार लांबी ३८.४२ कि.मी. असून NH-752-K परभणी–गंगाखेड मार्गाची लांबी ३५.८८५ कि.मी. आहे. तसेच NH-361F च्या गंगाखेड–लोहा विभागातील संबंधित भाग परभणी व नांदेड या दोन्ही जिल्ह्यांत येत असल्याने त्याची संपूर्ण लांबी परभणी जिल्ह्याची म्हणून ग्राह्य धरू नये. NH-61 वरील परभणी बायपासच्या Parwa–Asola 4-lane section ची लांबी १५.२१४ कि.मी. आदी महामार्गावरील अतिक्रमणबाबतचा आढावा घेतला. पाथरी, मानवत व परभणी तालुक्यांतील काही प्रमुख जिल्हा मार्गांचे राज्य महामार्गात उन्नतीकरण झाल्याने ते ही अतिक्रमणमुक्तीच्या नियोजनात समावेश करण्यात आला आहे.

# सावळदबारा येथील चक्रधर स्वामी मंदिरासाठी 2 कोटी 45 लाख रुपयांची कामे मंजूर — इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्याला यश

**सावळदबारा प्रतिनिधी** : सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील श्री चक्रधर स्वामी मंदिराच्या विकासासाठी पहिल्या टप्प्यात सुमारे २ कोटी ४५ लाख रुपयांची विकासकामांना मंजुरी मिळाली आहे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, इतर मागास बहुजन कल्याण विकास मंत्री ना. अतुलजी सावे तसेच माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सहकार्याने ही कामे मंजूर झाली असून, यासाठी इद्रिस मुलतानी यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. चक्रधर स्वामी मंदिराला ‘ब’ वर्गाचा दर्जा मिळवून देण्यासाठी इद्रिस मुलतानी यांनी विशेष प्रयत्न व सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून






मंदिराला ‘ब’ वर्गाचा दर्जा प्राप्त झाला. त्यानंतर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांसाठी त्यांनी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला. मंदिराच्या विकासासाठी शासनाने पहिल्या टप्प्यात सुमारे २ कोटी ४५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी दिली आहे. यामध्ये सभागृह बांधकामासाठी 1 कोटी रुपये, तर रस्ता, स्वच्छतागृह व प्रसाद व्यवस्थेसाठी ५० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच मंदिर संरक्षण भिंतीसाठी 50 लाख व पथदिव्या साठी 25 लाख रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. या निधीतून मंदिर परिसरात भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा निर्माण होणार असून, रस्ते, स्वच्छतागृह, प्रसाद व्यवस्था आणि सभागृह यामुळे भाविकांची मोठी सोय होणार आहे. मंदिराच्या विकासामुळे सावळदबारा परिसराच्या धार्मिक व पर्यटन विकासालाही चालना मिळणार आहे. फर्दापूर जिल्हा परिषद गटातील या विविध विकासकामांसाठी इद्रिस मुलतानी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, ना. जयकुमार गोरे, ना. अतुलजी सावे आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे विकासकामांना मोठी चालना मिळाली आहे. फर्दापूर जिल्हा परिषद गटाच्या विकासासाठी शासनाकडून मंजूर झालेल्या या निधीमुळे धार्मिक स्थळांचा विकास, मूलभूत सुविधा आणि गावातील पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार असून, पुढील काळातही विकासकामांसाठी पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याची माहिती इद्रिस मुलतानी यांनी दिली.

# जिन्सी पोलिसांच्या तत्परतेने आणला आजोबांच्या चेहऱ्यावर आनंद, परत मिळाला हरवलेला मोबाईल



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर - पोलिसांचे नाव ऐकले की गुन्हे, तपास आणि तक्रारींचे कटकट असलेले चित्र सामान्यतः डोळ्यांसमोर उभे राहते; परंतु अनेकदा खाकी वर्दीतील संवेदनशील माणसे आणि सामान्य नागरिकांचे प्रामाणिक प्रयत्न समाजासमोर माणुसकीचे नवे दर्शन घडवतात. अशीच एक मनाला आनंद देणारी घटना छत्रपती संभाजीनगरमधील जीन्सी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून, एका प्रामाणिक रिक्षाचालक आणि जीन्सी पोलिसांच्या संयुक्त कामगिरीमुळे ८२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा हरवलेला मोबाईल त्यांना सन्मानाने परत मिळाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंचशीलनगर परिसरात राहणारे ८२ वर्षीय किसानराव लक्ष्मणराव आमराव यांचा नामांकित कंपनीचा मोबाईल नुकताच कुठेतरी हरवला होता. वयोवृद्ध असल्यामुळे मोबाईल हरवल्याने त्यांची प्रचंड गैरसोय झाली होती आणि दैनंदिन संपर्कात अडथळे निर्माण झाल्याने ते चिंतेत होते. हा मोबाईल वाहब जानीमिया शेख नावाच्या एका रिक्षाचालकाला त्यांच्या रिक्षात प्रवाशादरम्यान सापडला. प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण देत एक क्षणही वाया न घालवता त्यांनी तो मोबाईल थेट जीन्सी पोलीस ठाण्यात जमा केला. एका रिक्षाचालकाच्या या प्रामाणिकपणाची चर्चा सध्या परिसरात सर्वत्र होत असून त्याचे कौतुक केले जात आहे.

रिक्षाचालकाने मोबाईल जमा केल्यानंतर, जीन्सी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश ताठे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तात्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानुसार, पोलीस उपनिरीक्षक सुनील मोरे, हेड कॉन्स्टेबल उईके, महिला पोलीस कॉन्स्टेबल काकडे आणि बालाजी टोटेवाल यांनी तातडीने पावले उचलत तांत्रिक तपासाच्या आधारे मोबाईलच्या मूळ मालकाचा शोध घेतला. सर्व कायदेशीर खात्री केल्यानंतर, पोलिसांनी तो मोबाईल वृद्ध किसनराव आमराव यांना अत्यंत सन्मानाने पोलीस ठाण्यात बोलावून परत केला. आपला हरवलेला मोबाईल आणि त्यातील महत्त्वाची माहिती सुरक्षितपणे हातात पडताच, ८२ वर्षीय किसनराव यांच्या चेहऱ्यावर जुने हास्य परतले. त्यांनी समाधान व्यक्त करत जीन्सी पोलीस दल आणि प्रामाणिक रिक्षाचालक यांचे मनापासून आभार मानले.

# ‘खेलो इंडिया संवाद-युवा कनेक्ट’ कार्यक्रमाचे गुरुवारी आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,:** राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या पार्श्वभूमीवर ‘मेरा युवा भारत’च्या सहकार्याने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ‘खेलो इंडिया संवाद-युवा कनेक्ट’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार (दि. 27) रोजी श्री शिवाजी महाविद्यालयात करण्यात आले आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. यानिमित्ताने युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे, क्रीडा विकासाला चालना देणे आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका बळकट करणे या उद्देशाने देशभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, खेळाडू, युवा नेते, स्वयंसेवक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांना एका व्यासपीठावर आणून भारतातील क्रीडा क्षेत्राचा विकास, युवकांच्या आकांक्षा आणि भविष्यातील संधी याबाबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आभासी संवाद

# हाजी दौलत खान पठाण यांची भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र अल्पसंख्याक मोर्चाच्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली असून, छत्रपती संभाजीनगरचे हाजी दौलत खान पठाण यांची प्रदेश उपाध्यक्षपदी महत्त्वपूर्ण नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. रविंद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.



हाजी दौलत खान पठाण यांच्या नियुक्तीचे वृत्त समोर येताच संपूर्ण महाराष्ट्रातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. संघटनात्मक कार्याचा अनुभव, सामाजिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग तसेच अल्पसंख्याक समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करण्याची भूमिका यामुळे पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविल्याचे मानले जात आहे.

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे कै. बाबुरावजी काळे यांची जयंती उत्साहात साजरी

हिंदू प्रकाशवार्ता )प्रतिनिधी

सोयगाव,दि.२५ ऑगस्ट

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव येथे महाराष्ट्राचे भाग्यविधाते,लोकनेते, स्वातंत्र्य सेनानी,माजी मंत्री तथा माजी खासदार कै.बाबुरावजी काळे यांची १०१ वी जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवर, शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभिवादन केले.“समाजासाठी जगणे हीच खरी नेतृत्वाची ओळख!” या विचाराला आपल्या कार्यातून सार्थ ठरविणारे कै. बाबुरावजी काळे यांनी सोयगाव तालुक्याच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या प्रयत्नांतून सोयगाव तालुका निर्मितीला दिशा मिळाली.तसेच सोयगाव शहरातील एस.टी.डेपो उभारणीसाठी योगदान देतानाच ३२ के.व्ही. वीज केंद्राला मंजुरी मिळवून देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.



अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक म्हणून त्यांनी डोंगराळ व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची ज्योत पोहोचविण्याचे महान कार्य केले. शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत त्यांनी शिक्षण क्षेत्रातही अमूल्य योगदान दिले.

कै.बाबुरावजी काळे यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी आणि त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कार्यातून प्रेरणा मिळावी,या उद्देशाने जयंतीनिमित्त शाळेत चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलाकृती व निबंधाच्या माध्यमातून कै.बाबुरावजी काळे यांच्या कार्याला उजाळा दिला.याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून तेजस्विनी रोहित काळे उपस्थित होत्या. तसेच कृष्णा जुनघरे,विजय गव्हाड व सुधाकर सोहनी यांची प्रमुख उपस्थिती लाभली,तसेच शाळेचे मुख्याध्यापक हरिदास काटोले, किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अंकुश काळे, अनिल देसाई,विवेक महाजन,तानाजी चव्हाण,तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

कै.बाबुरावजी काळे यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त त्यांच्या दूरदर्शी कार्याला व स्मृतीला विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कार्याची माहिती व प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.

एकूणच,जयंतीनिमित्त आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धा तसेच विविध उपक्रमांमुळे शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण व प्रेरणादायी झाले.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रम अतिशय उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न झाला.

# गोरखा रेजिमेंटच्या शौर्याला रॉयल एनफिल्डची मानवंदना

मुंबई : रॉयल एनफिल्डने क्लासिक ३५० गोरखा एडिशन भारतीय बाजारात लाँच केले आहे. गोरखा रेजिमेंटच्या समृद्ध वारशाला समर्पित या मोटरसायकलमध्ये क्लासिक ३५०चे आयकॉनिक डिझाइन कायम ठेवण्यात आले असून, विशेष गोरखा ग्रीन रंग आणि क्रॉस केलेल्या खुकरीचे चिन्ह हे तिचे प्रमुख आकर्षण आहे. दैनंदिन रायडिंगसाठी असिस्ट अँड स्लिपर क्लच आणि टाइप-सी यूएसबी फास्ट चार्जिंग पोर्ट देण्यात आला आहे.रॉयल एनफिल्डचे चीफ कमर्शियल ऑफिसर यदविंदर सिंग गुलेरिया म्हणाले, “क्लासिक ३५० गोरखा एडिशनद्वारे निडर शौर्य, निष्ठा आणि सन्मानाने परिभाषित लष्करी वारशाला मानवंदना देत आहोत.

# कै.बाबुरावजी काळे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात प्रेरणादायी व्याख्यान

हिंदू प्रकाशवार्ता /प्रतिनिधी

सोयगाव,दि.२५ ऑगस्ट

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथे अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक,माजी लोकसभा सदस्य,महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील माजी ज्येष्ठ मंत्री तथा मराठवाड्याच्या विकासाचे शिल्पकार कै.बाबुरावजी काळे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.मंगळवार दि.२५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रंगनाथ काळे होते.कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून माजी नगराध्यक्ष हर्षवर्धन जाधव तसेच पंडित नेहरू महाविद्यालयातील प्रा. डॉ.भाऊसाहेब गाडेकर यांची उपस्थिती लाभली.प्रमुख उपस्थितींमध्ये अजिंठा शिक्षण संस्थेचे संचालक रोहितभैया काळे,तेजस्विनीताई काळे, राजू दसपुते,भोकरदन शहराचे विद्यमान नगराध्यक्ष समीर बेग मिर्झा आणि विलासजी काबरा यांचा समावेश होता.

यावेळी आपल्या मार्गदर्शनातून प्रमुख वक्त्यांनी कै. बाबुरावजी काळे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि कार्यकर्तृत्वाचा विविध पैलूंनी आढावा घेतला.शिक्षण, सामाजिक बांधिलकी,स्वातंत्र्य चळवळ,ग्रामीण विकास तसेच मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची माहिती उपस्थितांना करून देण्यात आली.समाजाच्या विकासासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम असून,कै.बाबुरावजी काळे यांनी शिक्षणसंस्था उभारून ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची दारे खुली केली,हा त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले.

कै.बाबुरावजी काळे यांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण करून त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.त्यांच्या दूरदृष्टीमुळे आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे अजिंठा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली असून, संस्थेच्या माध्यमातून त्यांचे कार्य पुढे नेले जात असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी केले

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील, डॉ.शंतनू चव्हाण, डॉ.प्रमोद पवार आणि डॉ.ज्योती स्वामी यांनी परिश्रम घेतले.महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कै.बाबुरावजी काळे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या व्याख्यानातून त्यांच्या विचारांचा,कार्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा जागर करण्यात आला.त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रमेश औताडे यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांनी मानले.

# प्रतिकुलतेवर मात करुन यशाला गवसणी घालणाऱ्या खरवलीच्या शुभम जंगम यांची यशोगाथा ठरणार स्पर्धा परीक्षार्थींसाठी दीपस्तंभ

**बोरघर, माणगांव /रायगड** : माणगाव तालुक्यातील मौजे खरवली या ग्रामीण भागातून महाराष्ट्राला एक प्रेरणादायी यशकथा मिळाली आहे. खरवली चे सुपुत्र शुभम महेंद्र जंगम यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

सन २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या MPSC राज्यसेवा परीक्षेत शुभम यांनी ओबीसी प्रवर्गातून संपूर्ण महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळवत विक्रमी कामगिरी केली आहे. या यशाच्या जोरावर त्यांची GST विभागात राज्य विक्रीकर सहायक Assistant State Tax Inspector या प्रतिष्ठित पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या यशामुळे जंगम कुटुंबासह संपूर्ण खरवली गाव आणि माणगाव तालुक्याचा नावलौकिक वाढला आहे.

*शिक्षणाचा प्रवास - जिल्हा परिषदे पासून इंजिनिअरिंग पर्यंत* शुभम यांचा शैक्षणिक प्रवास ग्रामीण संघर्षाचे उत्तम उदाहरण आहे.

इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे शिक्षण त्यांनी प्राथमिक शाळा



खरवली येथे पूर्ण केले. ५ वी ते ९ वी पर्यंत नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली आणि ९ वी ते १२ वी पर्यंतचे शिक्षण अशोक दादा साबळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, माणगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि कम्युनिकेशन शाखेतून अभियांत्रिकीची पदवी संपादन केली. इंजिनिअरिंग नंतर तब्बल पाच वर्षे सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध अभ्यास करून त्यांनी हे यश खेचून आणले आहे.

***संस्कार आणि कष्ट - यशाचा पाया*** : या यशामागे कौटुंबिक संस्कारांचा मोठा वाटा आहे. शुभम यांचे वडील महेंद्र जंगम हे नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली येथे शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. आई माधुरी जंगम या गृहिणी आहेत. शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या कुटुंबात वाढल्याने लहानपणापासूनच अभ्यासाची गोडी त्यांच्यात निर्माण झाली. कोणतेही ध्येय समोर ठेवल्यास ते पूर्ण होईपर्यंत माघार न घेण्याची वृत्ती त्यांच्या यशात निर्णायक ठरली. शुभम यांनी सांगितले की, या प्रवासात शिक्षकांचे मार्गदर्शन, कुटुंबीयांचा अढळ विश्वास आणि मित्र परिवाराचे प्रोत्साहन हे तीन आधारस्तंभ ठरले.

***ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ***: मोठ्या शहरातील क्लासेस आणि सुविधा नसतानाही केवळ स्व-कष्टावर राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवता येते, हे शुभम यांनी सिद्ध करून दाखवले आहे. माणगाव तालुक्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी त्यांची ही कहाणी प्रेरणादायी आदर्श ठरली आहे.

***खरवली मध्ये भव्य मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन*** :या नेत्रदीपक यशाचा गौरव म्हणून खरवली ग्रामस्थांच्या वतीने मंगळवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता खरवली गावातून खरवली हायस्कूल पर्यंत भव्य मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

# नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांचा सत्कार



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या प्राथमिक शिक्षणाधिकारीपदी नव्याने नियुक्त झालेले आयुष्यमान संघरत्न सरोदे यांचा ज्ञानसंदीप शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते शाल, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाक्षरीचे तैलचित्र तसेच डॉ. शेखर मगर संपादित 'प्रकाश सोनवणे - वंचितांचा ज्ञानदीप' या गौरवग्रंथाची प्रत भेट देऊन सरोदे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी शिक्षण विभागातील कर्तव्यदक्ष प्रशासनाधिकारी प्रदीप भैय्या राठोड, उपशिक्षणाधिकारी श्रीमती नीता श्रीश्रीमाळ, संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप सोनवणे, ज्ञानसंदीप प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे तसेच किरणकुमार सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षणाधिकारी संघरत्न सरोदे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील यशस्वी कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वासही

# पितळखोरा ते पाटणादेवीचा 'हेरिटेज ट्रेल'; इतिहास, पुरातत्त्व आणि निसर्गाचा अनोखा अनुभव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : प्राचीन इतिहास, पुरातत्त्वीय वारसा, अध्यात्मिक परंपरा आणि निसर्गसौंदर्याचा प्रत्यक्ष अनुभव देणारा 'पितळखोरा ते पाटणादेवी हेरिटेज ट्रेल' इतिहासप्रेमींसाठी संस्मरणीय ठरला. शहरनामा टीमच्या वतीने आयोजित या उपक्रमात ४० हून अधिक इतिहासप्रेमींनी सहभागी होत या परिसरातील समृद्ध वारशाची प्रत्यक्ष ओळख करून घेतली.




एमजीएम विद्यापीठाचा इतिहास व पुरातत्त्व विभाग, आख्यान फाउंडेशन, गरवारे कम्युनिटी सेंटर, अॅडगाइड मीडिया प्रा. लि., रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर ईस्ट, केंद्रीय पर्यटन विभाग आणि टीम शहरनामा यांच्या संयुक्त सहभागातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

हेरिटेज वॉकसोबतच 'हेरिटेज ट्रेल' ही संकल्पना रुजविण्याच्या उद्देशाने शहरनामाच्या वतीने केवळ माहिती देण्याऐवजी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन इतिहास आणि वारसा समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मूर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव आणि एमजीएम विद्यापीठातील पुरातत्त्व अभ्यासक आशुतोष पाटील यांनी पितळखोरा व पाटणादेवी परिसराचा इतिहास, पुरातत्त्वीय अवशेष, स्थापत्यकला, शिल्पकला, शिलालेख आणि सांस्कृतिक वारशाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

पितळखोरा लेण्यांची माहिती देताना डॉ. पाईकराव यांनी या लेण्यांचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले. प्राचीन व्यापारी मार्गांशी असलेला संबंध आणि बौद्ध धर्माच्या प्रसाराच्या दृष्टीने पितळखोऱ्याला विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. सह्याद्रीच्या सातमाळा पर्वतरांगांमध्ये वसलेला पितळखोरा लेणी समूह हा महाराष्ट्रातील प्राचीन बौद्ध शैलगृहांचा महत्त्वपूर्ण वारसा आहे. येथे चैत्यगृहे, विहार, स्तूप, शिल्पकला तसेच विविध पुरातत्त्वीय अवशेष पाहायला मिळतात.

यानंतर सहभागींची पाटणादेवी मंदिर परिसराला भेट झाली. निसर्गरम्य वातावरणात वसलेले पाटणादेवी हे केवळ धार्मिक स्थळ नसून या प्रदेशाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे महत्त्वपूर्ण केंद्र असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. प्रसिद्ध गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्याशी निगडित संदर्भ या परिसराशी जोडले जात असल्याने पाटणादेवीचे ऐतिहासिक महत्त्वही अधोरेखित झाले.

लेणी, शिल्पे, शिलालेख, प्राचीन वास्तू आणि त्यामागील इतिहास याबाबत सहभागींनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारत तज्ज्ञांशी संवाद साधला. पुस्तकांमध्ये वाचलेला इतिहास प्रत्यक्ष स्थळावर जाऊन अनुभवता आल्याने हा उपक्रम अत्यंत वेगळा आणि संस्मरणीय ठरल्याची भावना सहभागींनी व्यक्त केली.

यावेळी गरवारे कम्युनिटी सेंटरचे संचालक सुनील सुतवणे, रमाकांत रौतल्ले आणि भारत पर्यटन विभागाच्या सहाय्यक निदेशक स्नेहल पाटील यांच्यासह आयोजक व सहभागी उपस्थित होते.

स्थानिक वारशाबाबत जनजागृतीचा प्रयत्न

स्थानिक तसेच दुर्लक्षित ऐतिहासिक वारसा स्थळांबाबत जनजागृती निर्माण करणे, तरुण पिढीला इतिहास व पुरातत्त्वाशी जोडणे आणि वारसा संवर्धनाची भावना निर्माण करणे हा या हेरिटेज ट्रेलचा प्रमुख उद्देश होता. पितळखोरा ते पाटणादेवी हेरिटेज ट्रेलला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा छत्रपती संभाजीनगर आणि परिसरातील समृद्ध वारशाबद्दल नागरिकांमध्ये वाढत असलेल्या कुतूहलाचे द्योतक ठरला.

# आईसोबतच्या वादानंतर तरुण चढला टॉवरवर

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील सावंगी येथील महाकाली मंदिर परिसरात आईसोबत झालेल्या वादातून एका तरुणाने थेट मोबाईल टॉवरवर चढल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. नुकत्याच घडलेल्या खवडा डोंगर दुर्घटनेची आठवण ताजी असतानाच घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात काही वेळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलीस आणि अग्निशमन दलाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सावंगी परिसरातील महाकाली मंदिर भागात एका तरुणाचा त्याच्या आईसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादानंतर संतापलेल्या तरुणाने टोकाचे पाऊल उचलत थेट परिसरातील एका मोबाईल टॉवरवर ६०-७० फूट उंची गाठली. ही बाब लक्षात येताच स्थानिकांनी तात्काळ याची माहिती पोलीस व अग्निशमन दलाला दिली.

# द. ग. तटकरे महाविद्यालयात MSBTE चे 3 पदविका अभ्यासक्रम सुरू

**बोरघर, माणगाव /रायगड** : युवकांना थेट उद्योग क्षेत्राशी जोडणारे आणि रोजगाराभिमुख व्यावसायिक शिक्षण देण्याच्या दिशेने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयाने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने (MS-BTE) महाविद्यालयाला नवीन कौशल्य आधारित पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास अधिकृत मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून हे अभ्यासक्रम सुरू होणार आहेत. यामध्ये खालील तीन अत्यंत मागणी असलेल्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

- *सीबी (CB) - अॅडव्हान्स डिप्लोमा इन सायबर सिक्युरिटी मॅनेजमेंट*
- *डीबी (DB) - डिप्लोमा इन अॅनिमेशन अँड ग्राफिक्स*
- *एलएक्स (LX) - अॅडव्हान्स डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (DMLT)*

या मान्यतेमुळे माणगाव पंचक्रोशीमध्ये अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या लौकिकात आणखी भर पडली आहे.

*अभ्यासक्रमाचा उद्देश काय?*

या पदविका अभ्यासक्रमांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, उद्योग जगतातील बदलत्या गरजांनुसार प्रत्यक्ष तांत्रिक व व्यावहारिक कौशल्ये प्रदान करणे हा आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होताच सहज रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या कोर्सेसमुळे तांत्रिक शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या अखत्यारीतील या शासनमान्य पदविका संपूर्ण भारतातील उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मान्यताप्राप्त आहेत. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर करिअरच्या संधी खुल्या होणार आहेत.

*दूरदृष्टी नेतृत्वाचे यश*

विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याचा विचार करून हा महत्त्वाकांक्षी निर्णय मंडळाचे अध्यक्ष *मा. अॅड. राजीवजी साबळे साहेब* यांनी घेतला. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली, येणाऱ्या सर्व अडचणींवर धैर्याने मात करून हे अभ्यासक्रम प्रत्यक्षात आणले गेले. यासाठी त्यांना कार्यकारी मंडळातील सर्व संचालक आणि महाविद्यालय विकास समितीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या नवीन अभ्यासक्रमांमुळे माणगाव परिसरातील उद्योग-केंद्रित करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक नवी आणि भक्कम वाट खुली झाली आहे.

# मेरा रेशम मेरा अभिमान-2' अंतर्गत शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी,** : 'मेरा रेशम मेरा अभिमान-२' उपक्रमांतर्गत मंगरूळ येथे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी तांत्रिक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात केंद्रीय रेशीम संशोधन विस्तार केंद्राचे शास्त्रज्ञ-डी तथा संयुक्त संचालक श्री. ए. एल. जाधव यांनी रेशीम किड्यांमध्ये नॉन-स्पिनिंगची समस्या निर्माण होण्याची कारणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, तसेच पिवळ्या कोळीचा प्रादुर्भाव ओळखून त्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्याबाबत रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना माहिती दिली.

'उझी माशीचे नियंत्रण व जैविक नियंत्रणासाठी सूक्ष्म परजीवी गांधीलमाशीचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करताना उझी माशीचा प्रादुर्भाव, त्यापासून होणारे नुकसान आणि जैविक नियंत्रण पद्धतींचा योग्य वापर याबाबत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील रेशीम संशोधन युनिटचे डॉ. एस. बोकण यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. रेशीम उद्योगासाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, अनुदान व शासकीय सुविधांची माहिती दिली. उपलब्ध योजनांचा लाभ घेऊन रेशीम उद्योग अधिक सक्षम व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्याचे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालयाचे श्री. मिसाळ यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांनी रेशीम उत्पादनातील विविध अडचणींबाबत तज्ज्ञांशी संवाद साधून मार्गदर्शन घेतले. यामुळे वैज्ञानिक पद्धतीने रेशीम उत्पादन, उझी माशीचे जैविक नियंत्रण, पिवळ्या कोळीचे व्यवस्थापन तसेच शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती झाली. आधुनिक व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा अवलंब करून रेशीम उत्पादन वाढविणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अशा तांत्रिक मार्गदर्शन कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमास परिसरातील सुमारे ३५ रेशीम उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# सिडको-वाळूज महानगरातील रस्त्यावर कचरा टाकणे गुन्हा! दंडात्मक कारवाई, फौजदारी

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** : सिडको-वाळूज महानगर अधिसूचित क्षेत्रातील रस्ते, मोकळे भूखंड व सार्वजनिक ठिकाणी वाढत असलेल्या कचऱ्याच्या समस्येला आळा घालण्यासाठी सिडको प्रशासनातर्फे प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे. वाळूज महानगरमधील नागरिकांनी त्यांच्या घरातील ओला व सुका कचऱ्याचे वर्गीकरण करून, तो स्वतंत्रपणे सिडकोच्या घंटागाडीमध्ये जमा करावा. सिडको अधिसूचित क्षेत्रातील नागरिकांनी या शिवाय अन्यत्र कचरा टाकू नये.

तसेच सिडको-वाळूज महानगर अधिसूचित क्षेत्राबाहेरील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या घरातील ओला व सुका कचऱ्याची त्या-त्या नियुक्त नियोजन प्राधिकरणामार्फत / विभागामार्फत असलेल्या व्यवस्थेनुसार विल्हेवाट लावावी. सिडको अधिसूचित क्षेत्राबाहेरील नागरिकांनी सिडकोच्या रस्त्याशेजारी, सिडको हद्दीत कचरा फेकू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिडको-वाळूज महानगर हद्दीत अथवा सिडको रस्त्याशेजारी कचरा टाकल्यास किंवा टाकतांना आढळल्यास अथवा कचरा जाळतांना आढळल्यास संबंधितांविरुद्ध दंडात्मक कारवाई अंतर्गत पहिल्यांदा कचरा टाकल्यास अथवा जाळतांना आढळल्यास पाचशे रुपये दंड, दुसऱ्या वेळी हजार रुपये दंड, तर तिसऱ्या वेळी कचरा टाकतांना अथवा जाळतांना आढळल्यास सिडको प्रशासनामार्फत संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येईल. कचरा टाकणाऱ्यांवर विशेष भरारी पथकाची नजर राहणार आहे. नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य केल्यास सिडको-वाळूज महानगर परिसर स्वच्छ राहील, असे आवाहन सिडको प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# मराठवाड्याच्या विकासात बाबूरावजी काळे यांचा सिंहाचा वाटा - मानसिंह पवार

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२५ ऑगस्ट** : मराठवाड्याच्या विकासाच्या वाटचालीत माजी मंत्री,थोर स्वतंत्रसेनानी बाबूरावजी काळे यांचे योगदान सिंहाचा वाटा उचलणारे असून, त्यांनी आपल्या कार्यातून मराठवाड्याला सक्षम नेतृत्व दिले, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक मानसिंह पवार यांनी केले.पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात बाबूरावजी काळे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मानसिंह पवार यांना कै.बाबूराव काळे जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्यावेळी ते बोलत होते. मानसिंह पवार पुढे बोलताना म्हणाले, एकेकाळी मराठवाडा नेतृत्वाच्या दृष्टीने अभावग्रस्त होता. मात्र, बाबूरावजी काळे



आणि बाळासाहेब पवार यांसारख्या नेत्यांनी ही उणीव भरून काढत मराठवाड्याला राज्याच्या नेतृत्वात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. त्यांच्या संघर्षामुळे आणि दूरदृष्टीमुळे मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळाली. येणाऱ्या काळात नवीन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आत्मसात करून त्याचा योग्य वापर करणारी व्यक्तीच बदलत्या काळात टिकून राहील, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथरीकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बाबूरावजी काळे यांच्या आठवणींना उजाळा दिला. बाबूरावजी काळे यांचे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी असलेले जवळचे संबंध आणि त्यातून मराठवाड्याच्या विकासासाठी झालेल्या प्रयत्नांचा उल्लेख त्यांनी केला. बाबूरावजी काळे हे केवळ राजकीय क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्व नव्हते, तर त्यांच्या वैयक्तिक जीवनातही अनेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या वैयक्तिक जीवनातही बाबूरावजींचे मोलाचे योगदान होते, अशा आठवणी पाथरीकर यांनी सांगितल्या. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हा त्यांच्या नेतृत्वाचा विशेष गुण होता. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेऊन समाज आणि प्रदेशाच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अजिंठा शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाशदादा काळे यांनी बाबूरावजी काळे यांच्या हैदराबाद मुक्तिसंग्रामातील मोलाच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. निजामशाहीविरोधातील लढ्यात त्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम आणि व्याख्यानांचे आयोजन केले होते. या लढ्यात त्यांनी स्वतः सहभाग घेतला आणि त्यासाठी तुरुंगवासही भोगला. अप्पासाहेब यांनी स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी केलेल्या या संघर्षाचा आम्हा सर्वांना अभिमान आहे, असे मत प्रकाशदादा काळे यांनी व्यक्त केले. त्यांच्या त्यागातून आणि संघर्षातून आजच्या पिढीने प्रेरणा घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून असलेले शेषराव चव्हाण यांनी बाबूरावजी काळे हे कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे नेते होते, असे सांगितले.

# नवीन शेवा व शेवा कोळीवाडा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पालकमंत्र्यांचा पुढाकार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : नवीन शेवा व शेवा कोळीवाडा या दोन्ही विस्थापित गावांच्या प्रलंबित प्रश्नाला आता निर्णायक गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मंत्रालय, मुंबई येथे रायगडचे पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांची सदिच्छा भेट घेऊन ग्रामसुधारणा मंडळाच्या वतीने दोन्ही गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणी करण्यात आली.

माजी आमदार मनोहरशेठ भोईर व चंद्रकांत घरत यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमळाकर पाटील यांच्या पुढाकाराने ही भेट घेण्यात आली. यावेळी मंडळाच्या वतीने पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांचा पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी नवीन शेवा गावासाठी ३३.६४ हेक्टर तर शेवा कोळीवाड्यासाठी १७.०२ हेक्टर जमिनीशी संबंधित माहिती व दोन्ही गावांच्या प्रलंबित पुनर्वसन प्रश्नाबाबत सविस्तर निवेदन पालकमंत्र्यांना देण्यात आले.यावेळी माजी आमदार मनोहरशेठ भोईर, चंद्रकांत घरत व मच्छिमार नेते रमेश कोळी उपस्थित होते.प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेत पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी उपस्थितांच्या समक्षच रायगड जिल्हाधिकारी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक (MD) आणि कोकण विभागीय आयुक्त यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून, नवीन शेवा व शेवा कोळीवाड्यांचा प्रश्न अत्यंत ज्वलंत आणि महत्त्वाचा



असल्याचे स्पष्ट केले. तसेच या प्रश्नावर संबंधित सर्व विभागांची बैठक आयोजित करून तोडगा काढण्याच्या सूचना दिल्या. पुढील आठवड्यात उच्चस्तरीय संयुक्त बैठक

पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार सात-आठ दिवसांच्या आत कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नवीन शेवा व शेवा कोळीवाडा ग्रामस्थांच्या कमिटीसोबत संयुक्त बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या बैठकीस जेएनपीए चेअरमन, रायगड जिल्हाधिकारी, सिडकोचे एम डी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीत दोन्ही विस्थापित गावांच्या पुनर्वसनाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात आली आहे.गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नासाठी आता राज्य सरकारच्या पातळीवर थेट हस्तक्षेप सुरू झाल्याने नवीन शेवा व शेवा कोळीवाडा ग्रामस्थांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. आता बैठकीत केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष निर्णय घेऊन पुनर्वसनाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# 7 व्या जिल्हास्तरीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत विजय विकास सामाजिक संस्थेची दमदार कामगिरी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : मिक्स बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने ७ वी जिल्हास्तरीय मिक्स बॉक्सिंग स्पर्धा अलिबाग येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून अनेक संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करत कौशल्य, शिस्त आणि जिद्दीचे दर्शन घडवले.या स्पर्धेत विजय विकास सामाजिक संस्थेच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन प्रमुख पारितोषिकांसह सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई केली.



सुवर्णपदक पटकावणाऱ्या खेळाडूंमध्ये आसिफ खान, शिवांश सिंग, रेयांश पाटील, मेहबूब खान, श्लोक पाटील, झारा पटेल, जागृती घरत, सोहेल पटेल, नियान ठाकूर, हर्नल पाटील, जीत घरत, प्रीत घरत, ऋत्विक ठाकूर, प्रभास राजन्या आणि भक्ती भोईर यांचा समावेश आहे. रौप्यपदक चैतन्य स्वर, आयुष घरत, युग घरत, कुशल म्हात्रे आणि आशुतोष शेट्टी यांनी पटकावले. तर एस. आर. विधू आणि मुस्कान खान यांनी कांस्यपदक मिळवत संस्थेच्या यशात भर घातली. या सर्व खेळाडूंना विकास भोईर सर, दीपक घरत सर, प्रगती भोईर घरत मॅडम आणि अथर्व घरत सर यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण लाभले. खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामुळे विजय विकास सामाजिक संस्थेचा नावलौकिक वाढला असून, त्यांच्या मेहनतीचे, शिस्तीचे, जिद्दीचे आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचे हे फलित आहे. या यशाबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि प्रशिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911